FROM [illegible] GENERAL STORE FAX NO. :0215826140[illegible]

अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा
सातारा दिनांक [illegible]

प्रति,

मा. उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश पुणे.

विषय :- महाबळेश्वर -पाचगणी नगर भूमापन हद्दीतील व
महाबळेश्वर तालुक्यातील खाजगी वन-सदृश्य जमीन मोजणी
करावयाच्या मिळकती बाबतचा अंतिम अहवाल सादर करणे बाबत

विषयांकित प्रकरणी महाबळेश्वर-पाचगणी नगर भूमापन हद्दीतील व महाबळेश्वर तालुक्यातील खाजगी वन-सदृश्य मिळकतींचे सर्वेक्षण पूर्ण करणेत आले असून त्याबाबतचा अंतिम अहवाल (Activity Report) सोबत सादर केला असे. कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

28/3/2017

अधीक्षक भूमि अभिलेख
सातारा.

प्रत :- मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.) पुणे यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रत :- मा. जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट-पिटीशन क्रमांक ७३०८/२००२ मधील आदेशानुसार महाबळेश्वर-पाचगणी नगरपालिका व प्रादेशीक योजने अंतर्गत येणा-या क्षेत्रातील खाजगी वनसदृश्य जमिनीचे
मोजणीबाबतचा अंतिम अहवाल

---

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट-पिटीशन क्रमांक ७३०८/२००२ व पी आय एल क्रमांक ३९/२००३ मधील दिनांक १९/१०/२००६ चे आदेशामधील पानांक ६६ मध्ये मा. उच्च न्यायालयांने mapping आणि marking of forest on the land be completed by end of December २००६ असे आदेशीत केलेले आहे. सदर आदेशाचे अवलोकन करुन मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म राज्य) पुणे यांनी दिनांक ८/१२/२००६ रोजी सभा घेवून ( खाजगी मिळकती मधील वन सदृश्य क्षेत्र १२हेक्टर पेक्षा कमी असले तरी) वनसदृश्य जमिनीचे सर्वेक्षण सुरु करणेबाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे महाबळेश्वर नगर भूमापन हद्दीतील २२३ फ्रि होल्ड मिळकती, पाचगणी नगर भूमापन हद्दीतील ३२० मिळकती व महाबळेश्वर व पाचगणी येथील प्रादेशीक योजनेअंतर्गत येणा-या सर्व गावांचे (एकुण ५७गावे) सर्वेक्षण सुरु केले. सदरचे सर्वेक्षण काम दिनांक ३१/१२/२००६ पर्यंत पूर्ण शक्य नसलेने सिव्हील अॅप्लीकेशन नंबर ६२/२००६ मा उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल करुन त्यामध्ये दिनांक २२/१/२००७ रोजी सुनावणी होवून मा उच्च न्यायालय यांनी सर्व मोजणी काम दिनांक ३१/३/२००७ पूर्वी पूर्ण करणेचे आदेश दिलेले असून सदर मुदतीत मोजणी काम पूर्ण झाले नाही तर भूमि अभिलेख खात्यातील संबधीत यांचेकडून वसुली केली जाईल असे आदेशामध्ये निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने पुणे प्रदेशातील ई टी एस मशीनस पथक या विशिष्ट कामासाठी अन्य जिल्हयातील कर्मचा-यासह मा उपसंचालक भूमि अभिलेख , पुणे प्रदेश पुणे यांनी उपलब्द करुन दिले. त्याचप्रमाणे सातारा जिल्हयातील ५ तालुका निरीक्षक संवर्गातील वर्ग २ अधिका-याच्या नियंत्रणाखाली ५ सर्वेक्षण पथके तयार करणेत येवुन त्यांचेकडे नगर भूमापन महाबळेश्वर पाचगणी या व्यतिरिक्त प्रादेशीक योजनेतंर्गत समाविष्ठ असलेली ५७ गावे या सर्वेक्षण पथकाकडे सर्वेक्षण करणेसाठी देणेत आली. या पथकाने सदर ५७ गावापैकी सर्व गावाचे सर्वेक्षण फलकयंत्र फाळणी मोजणी, टेपने मापे घेणे अपकिप पध्दत इत्यादी मोजणी पध्दती वापरुन सर्वेक्षण काम पूर्ण केले आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे नमुद करणेत येत आहे.

| अ न | गावाचे नाव | मोजणी पथकाचा तपशील | एकुण मिळकती | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नगर भूमापन महाबळेश्वर | ई टी एस पथक | अ) ११४ भाडेपटटा मिळकती<br>ब) २२३ फ्रि होल्ड मिळकती | सर्वेक्षणाचे काम पूर्ण |
| २ | नगर भूमापन पाचगणी | ई टी एस पथक | ३२० मिळकती | सर्वेक्षण काम पूर्ण |

अधीक्षक भूमि अभिलेख सातारा यांचेकडील दिनांक २९/१/२००७ चे आदेशाने ५ विभागासाठी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख फलटण/सातारा/कराड/महाबळेश्वर व नगर भूमापन अधिकारी सातारा यांची पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करणेत आली व त्यांना खालीलप्रमाणे गांवाचे वाटप करणेत आले.

| अ न | पथक क्रमांक | समाविष्ठ गावे | पथक प्रमुख/अधिकारी यांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १ | कुमठे, पारसोंड पारपार, पेठपार, रानआडवागौड, कुंभरोशी, जावली, हरोशी, दरे तर्फ आटेगाव, बिरमणी, कासरुड, हातलोट, घतुरबेट मेटतळे | श्री वि ल भिंगारे, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख फलटण |
| २ | २ | दुधोशी, शिरवली, बिरवाडी, गोरोशी, दुधगांव, साजवंड देवळी, कळमगाव, उफाळे, तळदेव, चिंचर तर्फे सोळशी, धावरी, चिखली, पारुट, मालुसर, माघंर | श्री मो स काळे, नगर भूमापन अधिकारी सातारा |
| ३ | ३ | क्षेत्र महाबळेश्वर, गाळकमपेठ, नाकीदावाडी, शिंदोळा, घोणसपूर | श्री भू ना मोहिते, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख महाबळेश्वर |
| ४ | ४ | मेटगुताड, अवकाळी, गुरेघर, भेकवली, नावली, माचुतर, टेकवली मोळेश्वर, एंरडल, आढाळ, धारदेव | श्री के.एम. कणसे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कराड |
| ५ | ५ | भोसे, भिलार, दानवली, कासवंड, पांगारी, तायघाट, दांडेघर, गोडवली, खिंगर आंब्रळ, राजपूरी, पाचगणी | श्री स.या.भोसले, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख सातारा. |

महाबळेश्वर -पाचगणी प्रादेशिक योजने अंतगंत येणा-या एकूण ५७ गावांमधील वनसदृश्य क्षेत्राची मोजणी करणे कामी प्रथमत: महाबळेश्वर तालुक्याचा नकाशाचे आधारे ५ विभाग करणेत आले व प्रत्येक विभागास मोजणीचे काम करावयाचे गावांची यादी तयार करणेत आली.

सदर गावांतील वनसदृश्य जमिनीचे सर्वेक्षण करणेकामी सर्व पथक प्रमुख यांचे अधिनस्त सातारा जिल्हयातील सर्व वर्ग ३ कर्मचारी व शिपाई यांची नियुक्ती करणेत आली. सदरचे कामाबाबत लागणारे भूमि अभिलेख (Records) तालुका निरीक्षक भूमि अभिलेख महाबळेश्वर कार्यालयाकडून पुरविणेत आले. सदर कामाची पूर्तता कशी करावी याकामी मा. अप्पर जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे, मा. उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश पुणे यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करुन, गांवाना भेटी देवून वेळोवेळी मार्गदर्शनपर आवश्यक ते नियोजनबध्द काम करणेचे सुचित केले.

मा. वरिष्ठ कार्यालयांकडून वेळोवेळी देणेत आलेल्या सुचना व मार्गदर्शन यावरुन आज रोजी महाबळेश्वर पाचगणी प्रादेशिक योजने अंतर्गत येणा-या सर्व गांवातील वनसदृश्य जमिनीचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे.

महाबळेश्वर-पाचगणी प्रादेशिक योजने अंतर्गत येणा-या सर्व गांवामधील एकूण सर्व्हे नंबर व वनसदृश्य असलेले सर्व्हे नंबर यांचा तपशील खालील प्रमाणे असे.

| अ.नं. | पथक प्रमुख/अधिकारी नांव | गावाचे नांव | गावचे एकूण सर्व्हे न. | एकूण वनसदृश्य सर्व्हे नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| १ | श्री वि.ल.भिंगारे<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख फलटण | कुमठे, | १ ते ५७ | १५ |
| | | पारसोंड, | १ ते ३५ | १६ |
| | | पारपार, | १ ते ४६ | २१ |
| | | पेठपार, | १ ते ५ | नाही |
| | | रान आडवा गोंड, | १ ते १३ | ०३ |
| | | कुंभरोशी | १ ते ४९ | २६ |
| | | जावली | १ ते ७६ | ४५ |
| | | दरोशी | १ ते ६९ | १० |
| | | दरे तर्फ आटेगांव | १ ते २९ | १९ |
| | | चिरमणी | १ ते ४९ | २६ |
| | | कासरुंड | १ ते२४ | २१ |
| | | हातलोट | १ ते ६९ | ३६ |
| | | चतुरबेट | १ ते ११३. | |
| | | मंटतळे | १ ते १८ | ०५ |
| २ | श्री मो.स. काळे<br>नगर भूमापन अधिकारी सातारा | दुधोशी | १ ते १९ | ०९ |
| | | शिरवली | १ ते २६ | ११ |
| | | बिरवाडी | १ ते ११६ | ०६ |
| | | गोरोशी | १ ते १८ | ०१ |
| | | दुधगांव | १ ते ५७ | १८ |
| | | झांजवड | १ ते ५८ | १९ |
| | | देवळी | १ ते ९१ | १९ |
| | | कळमगांव (उपाळे) | १ ते ७९ | २६ |
| | | तळदेव | १ ते २९८ | १७ |
| | | चिखर तर्फे सोळशी | १ ते ३२ | ०२ |
| | | घावरी | १ ते ५१ | २३ |
| | | चिखली | १ ते २९ | ०६ |
| | | पारुट | १ ते ३८ | १६ |
| | | मांधर | १ ते २६ | ०९ |
| | | मालुसर | १ ते ३० | ०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री व्ही.एन. मोहिते<br>तालुका निरीक्षक भूमि महाबळेश्वर | क्षेत्र महाबळेश्वर | १ ते १२२<br>एकूण ५८रा.नं. | ३७ |
| | | मालकमपेठ | ४९ | ३० |
| | | नाकींदावाडी | १ ते २९ | १४ |
| | | शिंदोळा | १ ते ३० | १३ |
| | | घोणसपूर | १ ते १७ | ११ |
| | | उंबरी | १ ते ७३ | ०४ |
| ४ | श्री के.एम. कणसे<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कराड | मेटगुताड | १ ते २५ | ०४ |
| | | अवकाळी | १ ते ६९ | ०४ |
| | | गुरेघर | १ ते २२ | नाही |
| | | गोकवली | १ ते ५१ | ०८ |
| | | नावली | १ ते ५५ | ०५ |
| | | माचुतर | १ ते ४८ | ०३ |
| | | टेकवली | १ ते १९ | ०६ |
| | | मोळेश्वर | १ ते ११ | ०२ |
| | | एरंडेल | १ ते ३६ | नाही |
| | | आटाळ | १ ते १५ | ०१ |
| | | धारदेव | १ ते १३ | ०१ |
| | | बोडारवाडी | १ ते ४८ | नाही |
| ५ | श्री स.या. भोसले<br>तालुका निरीक्षक भूमि अभिलेख सातारा | भोसे | १ ते ७९ | ०२ |
| | | भिलार | १ ते ६० | ०५ |
| | | दानवली | १ ते ६३ | ०२ |
| | | कासवंड | १ ते ४८ | ०१ |
| | | पांगारी | १ ते १८ | ०९ |
| | | तायघाट | १ ते ३४ | ०५ |
| | | पाचगणी | २३ | ०१ |
| | | दांडेघर | १ ते ९० | ०३ |
| | | गोडवली | १ ते २७ | २३ |
| | | खिंगर | १ ते १०१ | ०५ |

अधीक्षक भूमि अभिलेख
सातारा.